जिल्हा परिषद, गडचिरोली
सामान्य प्रशासन विभाग
दुरध्वनी क्र: ०७१३२-२९७४६३ Email :- zpgadmail@gmail.com

क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-१(ब)/अनुकंपा/१५५६/२०२६ दिनांक :-०७/ ०९ /२०२६

पंजीकृत डाकेने

प्रति,

श्री./श्रीमती/कु.---

मु.--

विषय:- जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत सन २०२६ च्या अनुकंपा तत्वावर गट-क व गट-ड च्या पदावर नियुक्तीस पात्र असलेल्या उमेदवारांनी दस्तऐवज तपासणीकरीता उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र: अंकपा -१२२५/प्र.क्र.१२१/ म.लो.आ. दिनांक १७ जुलै, २०२५

२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.:अकंपा- २०२५/ प्र.क्र.४४२/आस्था-७, दिनांक ३१ जुलै, २०२५

३) कार्यालयीन परिपत्रक क्र. /जिपग/साप्रवि/आस्था-१(ब) /अनुकंपा/१५३३/२०२६ दिनांक ०२.०९.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की. संदर्भिय क्र. १ व २ मधील तरतूदीनुसार दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची अनुकंपा तत्वावर नियुक्ती संबंधाने संदर्भिय क्र. ३ चे परिपत्रकान्वये अनुकंपा गट-क व गट-ड ची अंतिम प्रतिक्षासूची प्रकाशित करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत रिक्त असलेल्या गट-क व गट-ड च्या पदावर अनुकंपा तत्वावर संभाव्य नियुक्ती संबंधाने दस्तऐवज पडताळणीकरीता आपण **सकाळी ठिक १०.३० वाजता राष्ट्रीय शहिद वीर बाबुराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक दस्तऐवजासह** तसेच दस्तऐवजाच्या छायांकित एका संचासह खालील दिनांकास उपस्थित राहावे.

दिनांक २२ सप्टेंबर, २०२६ **गट-क (अनुक्रमांक १ ते ९६ पर्यंत)**

दिनांक २३ सप्टेंबर, २०२६ **गट-क (अनुक्रमांक ९७ ते १७६ तसेच गट-ड १ ते १६ पर्यंत)**

तसेच अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची प्रक्रिया समुपदेशन व पारदर्शकता ठेवून राबविण्यात येईल. त्यामूळे उमेदवारांनी कोणत्याही आमीषाला/भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. याबाबत कोणीही रक्कमेची मागणी केल्यास किंवा नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवित असल्यास अनुकंपाधारक उमेदवारांनी खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधावा.

१) मा. सुहास गाडे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली. ९४०५२१७८७६

२) श्री. अनिकेत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.),जिल्हा परिषद,गडचिरोली. ९७६७५०१५३०

(अनिकेत पाटील)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गडचिरोली

प्रतिलिपी:- १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

२) मा. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.